**नियमित दिवाणी दावा क्र. १२६/२०२०**
**अशोक माने वि. अभिजीत माने व इतर**
**CNR No. MHSO07-000155-2020**

**<u>निशाणी क्र.२० वरील आदेश</u>**

सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–६ नियम–१७ व आदेश १ नियम १० प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादीने असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द प्रस्तुतचा दावा ठरावाकरिता व अनुषंगिक मागणी म्हणून निरंतर ताकिदीकरिता दाखल केला आहे. दावा मिळकत मूळची श्रीपाद वामन काणे यांच्या मालकी वहिवाटीची होती. सदर मिळकत दिनांक ०४/०९/१९८० रोजी रक्कम रुपये ४७,०००/– च्या मोबदल्यात वादी व बाजीराव दगडू माने यांनी खरेदी घेतली होती. त्याची फेरफार नोंद १२१० धरुन प्रमाणित करण्यात आली होती. त्यानंतर वादी प्रतिवादींचे वडील यांच्यामध्ये पंढरपूर येथील न्यायालयात रे.मु.नं. ५५३/१९८८ हा दावा दाखल करण्यात आला. सदर दाव्यात मौजे शेवते येथील जमीन गट क्र.६ व ट्रॅक्टर याबाबत तडजोड झाली. मौजे वाखरी येथील जमीन गट क्र.५९४ ही मिळकत वादी व बाजीराव दगडू माने यांनी एकत्र खरेदी केल्यामुळे सामाईकात ठेवली व त्यानंतर सदर मिळकतीवर वादी व प्रतिवादींचे वडील यांचा कब्जा होता. सदर मिळकत वादी स्वतः व प्रतिवादीचे वडील हे स्वतंत्ररित्या वहिवाटून उत्पन्न घेत असताना यातील वादीच्या वहिवाटीस प्रतिवादीच्या वडिलांनी हरकत अडथळा निर्माण केला. त्यावेळी वादीने मिळकतीबाबतची कागदपत्रे काढली

असता असे आढळून आले की, रे.मु.नं.५५३/१९८८ या दाव्यामध्ये वादी व प्रतिवादींचे वडील यांच्यामध्ये तडजोड होऊन गट क्र.५९४ मधील हिस्सा वादीने प्रतिवादींच्या वडिलांना सोडून दिल्याबाबत नमूद केले आहे व त्याप्रमाणे फेरफार क्र.२५०५ तयार करण्यात आली व सदर फेरफार नोंदीच्या आधारे वादीचे ७/१२ पत्रकी असणारे नाव कमी करुन प्रतिवादीच्या वडिलांनी गट क्र.५९४ पांडुरंग रामेश्वर माने यांना दिनांक २२/०३/१९९० रोजी विक्री केल्याचे दाखवले व तीच मिळकत दिनांक २६/१२/२००८ रोजी प्रतिवादीच्या नावे खरेदी घेतल्याचे दाखवले. परंतू सदरच्या नोंदी बोगस व पोकळ स्वरुपाच्या तयार करण्यात आल्या होत्या. वास्तविकपणे वादीने गट क्र.५९४ मधील त्याचा हिस्सा कधीही सोडून दिलेला नव्हता व नाही. सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना प्रतिवादीने त्रयस्थ इसमास सदरची मिळकत विक्री केली आहे व सदर मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचे हक्क, हितसंबंध निर्माण झालेले आहेत. त्यामुळे या दाव्यात कोणत्याही प्रकारचे आदेश झाल्यास सदर आदेशाचा परिणाम त्रयस्थ व्यक्तीवर होणार आहे. त्यामुळे या दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.३ म्हणून गौरी अविनाश भोसले यांना सामील करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

३. त्यानंतर वादी पुढे असे कथन करतो की, मूळ दावा कलम २ नंतर कलम २अ नमूद करुन अर्ज कलम ३ प्रमाणे दाव्यातील मजकूर दुरुस्त करण्यात यावा. तसेच दाव्याच्या विनंती कलम ५अ नंतर ५अ१ असे नमूद करुन खरेदीदस्त क्र.१७३३/२०२० हा दस्त वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही असे जाहीर ठराव होऊन मिळावे. तसेच विनंती कलम अ नंतर ब१ असे नमूद करुन दावा कलम १

मध्ये नमूद असणारी मिळकत या दाव्याचा निकाल लागेपर्यंत कोणासही विक्री, गहाण, दान करु नये अथवा सदर मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल प्रतिवादी क्र.३ यांनी स्वतः अगर इतरांमार्फत करु नये म्हणून प्रतिवादी क्र.३ यांच्याविरुध्द निरंतर ताकीद देण्यात यावी असा मजकूर लिहिण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

४. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्या म्हणण्याविना चालविण्यात आला.

५. सदर अर्जास प्रस्तावित प्रतिवादी क्र.३ यांनी नि.क्र.२८ कडे म्हणणे दाखल करुन सदर अर्जास हरकत नोंदवली आहे. ते असे कथन करतात की, गट क्र.५९४, क्षेत्र २ हे. ६० आर. ही जमीन प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याकडून दिनांक २५/०६/२०२० रोजी रजिस्टर दस्त क्र.१७३३/२०२० अन्वये रक्कम रुपये ८०,००,०००/- इतक्या मोबदल्यास खरेदी घेतली आहे व त्यानुसार दावा मिळकतीच्या ७/१२ उता-यावर मालक व कब्जेवहिवाटी सदरी प्रस्तावित प्रतिवादी यांच्या नावाची नोंद झाली आहे. प्रस्तावित प्रतिवादी यांनी दावा मिळकत खरेदी घेण्यापूर्वी संपूर्ण रेकॉर्डची पाहणी केली होती व प्रत्यक्ष मालकी व कब्जेवहिवाटीची खातरजमा केली होती. खरेदीपूर्व नोटीस वृत्तपत्रात दिलेली होती. परंतू मुदतीत कोणाचीही हरकत आलेली नाही. तसेच वादीने दाव्यासंदर्भात लिज पेंडन्सी बाबत कोणताही दस्त नोंदवलेला नव्हता व नाही. दावा मिळकतीसंदर्भात झालेले फेरफार नोंद क्र.२५०५, २८४३, ७४८१, ७४८२ या नोंदी कायम

आहेत. वादीने दाखल केलेला दावाच मुळात टेनेबल नाही. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

६. वादींचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे व अभिलेख वाचून पाहिला. वादी व प्रतिवादी वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

७. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्रमांक १ बाबतः</u>–

८. वादीच्या दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुतचा दावा जाहीर ठराव होऊन मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनानुसार गट क्र.५९४ ही मिळकत वादी व प्रतिवादी क्र.१ व २ यांचे वडील बाजीराव माने यांनी दिनांक २९/०८/१९८० रोजी नोंदणीकृत खरेदीखताने सामाईकात खरेदी केलेली होती. त्या अनुषंगाने वादीने सदरचे खरेदीखत याकामी दाखल केलेले आहे. तसेच वादीने सदर मिळकतीच्या संदर्भात झालेली इतर खरेदीखते देखील दाखल केलेली आहेत. दिनांक २९/०८/१९८० रोजीच्या खरेदीखताचे अवलोकन केले असता गट क्र.५९४ ची खरेदी वादी व प्रतिवादी क्र.१ व २ यांचे वडील बाजीराव माने यांनी

केल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरची मिळकत वादी व प्रतिवादी यांचे वडिलांच्या सामाईक मालकीची होती असे दिसून येते. त्यानंतर झालेल्या कोणत्याही खरेदीखताला वादी पक्षकार नाही. वादीचे असे कथन आहे की, रे.मु.नं.५५३/१९८८ मधील तडजोडीने वादीने सदर मिळकतीमधील हक्क प्रतिवादीच्या वडिलांच्या लाभात सोडून दिला आहे आणि त्या अनुषंगाने फेरफार नोंदी तयार करण्यात आल्या आहेत. परंतू त्या सर्व फेरफार नोंदी बेकायदेशीरपणे बोगस व खोटया कागदपत्रांच्या आधारे तयार करण्यात आल्या आहेत. सदर नोंदीद्वारे झालेली खरेदीखते वादी यांच्या हिश्यावर बंधनकारक नाहीत म्हणून वादीने प्रतिवादी यांच्या विरुध्द प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे आणि सदरचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादीने दावा मिळकतीची विक्री प्रस्तावित प्रतिवादी यांना केलेली आहे. सदरची बाब अभिलेखावर आणण्याकरिता वादीने दावा मिळकतीचा ७/१२ उतारा याकामी हजर केला आहे. सदर ७/१२ उता–यावरुन भोगवटदार सदरी प्रस्तावित प्रतिवादी यांचे नाव नमूद केलेले आहे. तसेच वादीने प्रतिवादी व प्रस्तावित प्रतिवादी यांचे दरम्यान झालेले खरेदीखत दाखल केले आहे. सदरचे खरेदीखत दावा मिळकतीसंदर्भात आहे.

९. सदरचा दावा वादीने जाहीर ठरावाकरिता दाखल केला असून सदरचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादीने प्रस्तावित प्रतिवादी यांचेसोबत खरेदीखत केल्यामुळे सदर मिळकतीत त्रयस्थ इसमांचे हक्कहितसंबंध निर्माण झाले आहेत व दाव्याचा परिणामकारक आदेश पारित करण्यासाठी प्रस्तावित प्रतिवादी आवश्यक

पक्षकार आहेत. तसेच वादीने दाव्यात मागितलेली प्रार्थित दुरुस्ती देखील दाव्याचे संपूर्ण निराकरण होण्यासाठी तसेच पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी गरजेची आहे.

१०. प्रस्तुत दाव्यामध्ये अद्याप मुद्दे काढलेले नाहीत. तसेच वादी यांनी अर्जाद्वारे मागितलेली दुरुस्ती ही दावा दाखल केल्यानंतर घडलेल्या घटनांच्या अनुषंगाने आहे. त्यामुळे वादी यांनी मागणी केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणे गरजेचे आहे. सबब, प्रस्तावित प्रतिवादी क्र.३ यांना या दाव्याच्या कामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील करुन घेऊन वादीने अर्ज कलम ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व दुरुस्ती दाव्यात करणे गरजेचे आहे. वरील कारणास्तव मी खालील आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | वादींचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादींनी विहीत कालावधीत प्रस्तावित प्रतिवादी क्र.३ यांना दाव्यात सामील करुन व अर्ज कलम ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे योग्य ती दुरुस्ती करावी व तशी दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी. |

PRIYANKA NAMADEV PATHADE

Digitally signed by PRIYANKA NAMADEV PATHADE
Date: 2024.06.13 17:09:41 +0530

(पी.एन.पठाडे )

दिनांक – १२.०६.२०२४

६वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पंढरपूर

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 4th Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 12.06.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 12.06.2024 |
| Judgment/Order uploaded on | - | 13.06.2024 |